# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक 13/03/2018 रोजी (का.प.क्र.20) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दि.13/03/2018 रोजी (का.प.क्र.20) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11:45 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त,श्री.कृष्ण भालसिंग, नगर सचिव,श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
05. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
06. स.स.सिध्दांत संजय शिरसाट
07. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
08. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
09. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
10. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
11. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
12. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
13. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
14. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
15. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

श्री.शेख सोहेल : माजी पालकमंत्री व कॉग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते श्री.पंतगराव कदम यांचे दु:खद निधन झाल्यामुळे त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी.

श्री.सिताराम सुरे : यास माझे अनुमोदन आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : स.सदस्यांनी जो प्रस्ताव ठेवला त्याला माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : सभागृहाच्या वतीने माजी पालकमंत्री श्री.पंतगराव कदम यांचे दु:खत निधन झाल्याने श्रध्दांजली अर्पण करण्यात येते सर्वांनी उभे रहावे.

(यावेळी स्व.पंतगरावजी कदम यांना दोन मिनीटे स्तब्ध उभेराहुन सभागृहात श्रध्दांजली अर्पण केली.)

श्री.रेणुकादास वैद्य : शहरामध्ये 20-25 दिवसापासुन कचऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. अधिकाऱ्यांनी मागच्या 20-25 दिवसापासुन या शहरातील नागरीकांना जे वेठीस धरले नेमके या पासुन सुटका मिळण्यासाठी प्रशासनाने आतापर्यंत काय केले,खुलासा घ्यावा.

मा.सभापती : याबाबत आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.अतिरिक्त आयुक्त : 16 फेब्रुवारी पासुन नारेगाव येथील जनतेने कचरा टाकण्यासाठी बंदी घालण्यात आली. कचरा टाकण्यासाठी अनेक ठिकाणी पर्यायी जागेंचा शोध घेण्यात आला. मा.उच्च न्यायालयात ही त्याबाबत एक पीआय दाखल झाले. झोन नं.4,5,6 मध्ये वर्गीकरण करण्याचे काम चालु आहे. त्या तीन झोन मध्ये कचऱ्याची विलेवाटीची समस्या नाही. तीन झोन प्रमाणे जो मार्ग अवलंबला आहे त्याच मार्गाने इतर झोनमध्ये सुध्दा त्या प्रमाणे जन जागृती करुन लोकांकडुन कचरा वर्गीकरण करुन घेऊन त्याची विलेवाट लावायचे प्रयत्न सुरु आहे. या कचऱ्याच्या समस्येसाठी शासनाने नगर विकास विभागाच्या मा.सचिव श्रीमती.म्हैसेकर मॅडम यांनाही येथे पाठवले होते. त्यांनी सुध्दा जे काही

गार्डलाईन दिलेल्या आहेत त्या प्रमाणे सर्व वार्डमध्ये आपण कचरा वर्गिकृत करणे आणि त्याची विलेवाट शास्त्रोक्त पध्दतीने कंपोस्टींग करणे आणि कचरा विलेवाट करण्याचे प्रयोग सुरु केलेले आहे. शासनाने प्रत्येक झोनसाठी एक विशेष अधिकारी नेमुन दिले. 20-25 दिवसात रस्त्यावरचा 5400 टन कचरा वेगळ्या मार्गाने वेगळ्या जागा शोधुन तो खड्यांमध्ये टाकलेला आहे. अजुन साधारणतः 1500 टन कचरा आहे. त्याची सुध्दा विलेवाट लावायची आहे. प्रयत्न चालु आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : जो खुलासा केला आहे. या सगळ्या गोष्टी आम्हाला माहित आहेत.प्रशासनाकडुन काय ठोस पावले उचलली? कुठे जागा शोधली आहे? मागिल 25 दिवसापासुन प्रशासनाकडुन असे काहीही झालेले नाही. काही वार्डात चांगले काम होत आहे. जसे माझ्या वार्डात ओला कचरा डंम केला आहे खत निर्मित होत आहे. तसेच पुर्ण शहरामध्ये करण्यात यावे. मा.मुख्यमंत्र्यांनी स्वतः विधी मंडळात याबाबत खुलासा केल्यावर सुध्दा दुर्दैवाने प्रशासनाकडुन काहीच होत नाही. कचऱ्यावर प्रक्रिया कशी करता येईल?वार्डातला कचरा कसा डंप करता येईल?यासर्व गोष्टीवर प्रशासनाने लक्ष दिले पाहिजे. जागा बघण्याचे प्रयत्न झाले. घनकचरा विभागातील अधिकारी यांनी सहा महिन्यामध्ये कचऱ्याची विलेवाट लावण्यासंदर्भात काय प्रयत्न केले?या शहरामध्ये कचऱ्याची कोंडी फोडण्यासाठी काय नियोजन करणार आहे याचा खुलासा करण्यात यावा.

श्रीमती.मनिषा मुंढे : माझ्या वार्डात दोन खड्डे आहे. वार्डातील नागरिकांना ओला आणि सुखा कचरा वेग-वेगळा करुन तेथे टाकण्यासाठी मी अहवान केले आहे. पाच वर्षापासुन माझ्या वार्डात कचरा वेगवेगळा होतो इतर वार्डात तशी सवय नागरीकामध्ये लागली पाहिजे. श्री.भालेराव हे चांगले काम करतात. माझ्या वार्डात एक वाहन कचऱ्यासाठी द्यावे.

श्री.सिताराम सुरे : जागो जागी कचऱ्याचे ढिगार पडलेले आहे. सगळ्या शहरामध्ये दुर्गंधी पसरली आहे. किती दिवस कचरा डम्पं करणार आहे जागा पुरतील का? लवकरात लवकर कचऱ्याची विलेवाट कशी लावता येईल याबाबत निर्णय घ्यावा. स.सदस्याची मदत घ्यावी. जकात नाका भागात कचरा साचला दुर्गधी सुटली तातडीने याबाबत निर्णय घ्यावा.

श्री.अजीम अहमद : झोन नं.3 मध्ये कचऱ्याच्या बाबतीत काय काम केले आहे?

मा.अति.आयुक्त : ओला आणि सुखा कचरा वर्गिकरण करुन घेणे आणि जागो-जागी त्याचे कंपोस्ट करणे हा सगळ्यात चांगला पर्याय आहे. त्या दृष्टिने सगळे प्रयत्न चालु आहे. ओला सुका कचरा वेगळा झाला पाहिजे. जिथे जागा मिळेल तिथे कंपोस्टींगचे काम सुरु करत आहोत. 25% भागाचा प्रश्न मिटला आहे. झोन क्र.7,8,9 काम सुरु आहे. झोन क्र.2 व 3 संदर्भात बैठक होणार आहे.

श्री.अजीम अहमद : 25 दिवसापासुन सेंट्रल नाक्याजवळील कचऱ्याच्या बाबतीत काय केले? झोन नं.3 मध्ये लवकरात लवकर कचऱ्याची विलेवाट लावण्यात यावी.

श्रीमती.किर्ती शिंदे : कचऱ्यावर कायमस्वरुपी तोडगा काढणे आवश्यक आहे. जवळ जवळच्या वार्डमध्ये कार्यशाळा घेणे आवश्यक आहे. कचऱ्याची विलेवाट लावण्यासाठी नागरिकानी सहकार्य केले पाहिजे. तशी जणजागृती करावी. अपार्टमेन्ट व इतर हौसींग सोसायटी असेल त्यांनी त्यांचा कचरा जागेवर डिस्पोज केला पाहिजे.

श्रीमती.संगिता वाघुले : माझ्या वार्डात या 25 दिवसामध्ये एक सुध्दा वार्ड अधिकाऱ्यांनी बैठक घेतलेली नाही. वार्डाच्या विहीरीमध्ये कचरा टाकत होतो आता ती सुध्दा भरत आलेली आहे. यापुढे नागरिकांनी कचरा टाकायचा कुठे? वार्डात ओपन स्पेस नाही. प्रत्येक बैठकीत मी कचऱ्याच्या गाडीसाठी बोलत आलेली आहे पण अजुन पर्यंत एक सुध्दा गाडी वार्डात दिली नाही. आज संध्याकाळ पर्यंत वार्डात कचऱ्याची गाडी चालु करण्यात यावी कचरा प्रोसेस मशीनरी घेऊन कूठे लावणार आहे. माझ्या वार्डात जागा नाही.

मा.सभापती : अति.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.अति.आयुक्त : श्रीमती.वाघुले ताई यांनी जो प्रश्न उपस्थित केला, कालच विभागीय आयुक्त कार्यालयात बैठक झाली ज्यात वार्ड अधिकारी यांनी गाडीचा प्रस्ताव दिलेला आहे. गाडी उपलब्ध होईल. (सर्व स.सदस्य एकाच वेळी मोठ-मोठ्याने बोलत होते.)

श्री.सिताराम सुरे : सगळे अधिकारी आणि कर्मचारी वसुलीसाठी लावण्यात आले आहे. आता पर्यंत त्यांनी वसुली किती केली? आऊट सोर्सिंगचे कर्मचारी घेतले आहे, काय काम करतात?

श्री.ऋषिकेश खैरे : शहरामधील 115 वार्डांना एक-एक रिक्षा देण्यासाठी अशी काही रिकॉरमेंट आलेली आहे का? वाढीव रिक्षा घेऊन वार्डात देण्यात याव्यात.

मा.अति.आयुक्त : प्रत्येक वार्डामध्ये दोन रिक्षा दिलेल्या आहेत. स्मार्ट सिटीमध्ये पन्नास रिक्षा घेत आहोत.

श्री.सिताराम सुरे : दिड वर्षापुर्वी या सभागृहामध्ये जेटींग मशिनची ऑर्डर दिलेली आहे. आता पर्यंत जेटींग मशिन का नाही आली? वार्डात तीस कर्मचारी पाहिजे तर तिथे फक्त 7-8 कर्मचारी काम करत आहे. वार्डात गंटा गाडी येत नाही.

मा.सभापती : स्मार्ट सिटी मधुन रिक्षा मिळत आहे. अजुन रिक्षा देण्याबाबत सुचना करत आहोत. श्रीमती.संगिता वाघुले यांच्या वार्डात आजच्या आज कचरा रिक्षा देण्यात यावी. सध्याची काय पोजिशन आहे? खुलासा करावा.

उप.अभियंता(यांत्रिकी) : सध्या 245 काही मनपाच्या आणि काही खाजगी रिक्षा उपलब्ध आहे. झोन क्र.5 मध्ये खाजगी 19 रिक्षा आणि मनपाच्या 11 रिक्षा असे 30 रिक्षा कार्यरत आहे. मिसरवाडी भागासाठी कालपासुन एक रिक्षा सुरु केलेली आहे. आणि जेटींग मशिन कंपलिट झालेल्या आहेत.

मा.सभापती : संबंधीत सर्व वार्ड अभियंता यांना आदेशित करण्यात येते की, ज्या ज्या ठिकाणी कचरा रिक्षा पाहिजे त्या वार्डात योग्य प्रकारे वाटप करण्यात यावे. वार्डामध्ये एक-एक रिक्षा सुरु करण्यात यावी. ज्या ज्या ठिकाणी कचरा टाकण्यासाठी जागा उपलब्ध आहे त्या ठिकाणी पाहणी केलेली आहे. आज सुध्दा काही ठिकाणांची पाहणी करणार आहोत. त्वरित हा साचलेला कचरा तीन ते चार दिवसामध्ये उचलण्यात येईल.

श्री.ऋषिकेश खैरे : सध्या रिक्षा किती कार्यरत आहेत? आणि रिकॉरमेंट किती आलेली आहे?

उप.अभियंता(यांत्रिकी) : सध्या मनपाच्या 108 रिक्षा उपलब्ध आहे आणि 138 रिक्षा खाजगी चालु आहे. असे एकुण 246 रिक्षा कार्यरत आहे. 40 रिक्षा खरेदीचे टेंडर प्रोसेसला आहे.

मा.सभापती : आठ दिवसात पुर्ण प्रक्रिया करावी.

श्रीमती.स्वाती नागरे : चार महिन्यापासुन मी जेटींग मशिनच्या संदर्भात बोलत आलेली आहे. वेळेवर जेटींग मशीन मिळत नाही.

उप.अभियंता(यांत्रिकी) : सहा जेटींग मशिन कंपलिट झालेल्या आहेत. त्याचे पेमेंट केल्या शिवाय ते येणार नाही. मंजुरीसाठी सादर केलेले आहे. मान्यता मिळाली की, मागविता येईल.

मा.सभापती : अकांऊट विभागाला आदेशित करण्यात येते की, याची पुर्णतः दखल घेण्यात यावी. जेटींग मशिन संदर्भात जी माहिती असेल ती प्रशासनाला द्यावी.

श्रीमती.संगिता वाघुले : लहान जेटींग मशिन आमच्या भागामध्ये येतच नाही कारण काय?

कनिष्ठ अभियंता : लहान जेटींग मशिन फक्त बुधवारी देण्यात येते.

श्रीमती.संगिता वाघुले : माझ्या वार्डातील गल्ल्या छोट्या आहेत. वार्डामध्ये छोट्या ऐवजी मोठ्या गाड्या पाठवतात. वार्डात लहान गाडीच पाठवण्यात यावी.

मा.सभापती : वार्डामध्ये रस्त्याची अडचण असल्यामुळे तेथे लहानच गाडी पाठवण्यात यावी.

श्रीमती.किर्ती शिंदे : महिलांसाठी आठ मार्च पर्यंत दोन शौचालय बांधुन देणार होते. त्याचे काय झाले?

कार्यकारी अभियंता(ड्रे) : मकबरा रोडवरील शौचालयाच्या कामाबद्दल तेथे इलेक्ट्रीक कनेक्शनस् नाही ते काम थोडे बाकी आहे. औरंगपुऱ्यातील काम वेगाने सुरु आहे. पैठण गेटला मी तीन वेळेस मार्कआंऊट घेण्याचा प्रयत्न केला. परवा तेथे मार्कआंऊट टाकल्यावर तेथे लोकांनी विरोध केला. त्यांचे म्हणणे आहे की 50 फुट मागे घ्या. यामध्ये समितीने निर्णय घ्यायचा

आहे की, ते मागे करायचे का नाही. त्याच्यासाठी तो प्रलंबीत आहे. जुबली पार्कमध्ये ही वाद झाल्यामुळे समिती सदस्यांनी तिथे काम नाही करायचे असा निर्णय घेतला त्या ऐवजी ते काम आता सेव्हन हिल येथे करायचे आहे. मकबरा परिसरातील शौचालय काम दहा दिवसामध्ये पुर्ण होईल. पैठण गेटमध्ये निर्णय झाला तर दोन महिन्यामध्ये ते ही काम पुर्ण होईल. जुबली पार्कच्या बाबतीत मा.महापौरांनी निर्णय दिला तर सेव्हन हिल येथे ते काम करुन घेता येईल.

मा.सभापती : स.सदस्यांनी ज्या सुचना केल्या आहे त्याची पुर्णतः दखल घ्या आणि त्वरित ते काम पुर्ण करा. सर्व महिला स्वच्छता गृह त्वरित बनवण्यात यावे.

श्रीमती.नरगीस शेख : माझ्या वार्डात ड्रेनेज लाईनचे क्रॉस कनेक्शनस् करणार होते. कटकट गेट येथील अतिक्रमण हटविले नाही.

मा.सभापती : स.सदस्य यानी केलेली सुचनेची दखल घेऊन त्वरीत कार्यवाही करावी.

श्रीमती.संगिता वाघुले : शौचालयाच्या मानधनाचे काय झाले? खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता(ड्रे) : सहा महिन्यापासुन आपल्याला शासनाचे अनुदान आले नाही.

श्रीमती.संगिता वाघुले : पंधरा लाभार्थ्यांच्या मानधनाचे काय झाले?

कार्यकारी अभियंता(ड्रे) : पंधरा केसेसच्याबाबतीत मी वार्ड अभियंता श्रीमती.खरपे मॅडम यांच्याकडे जाऊन बैठक घेतली. लवकरच निर्णय होईल.

मा.सभापती : अति.आयुक्त स्वतः लक्ष घालावे. त्यांना जे शासनाकडे अडीअडचण निर्माण झाली आहे त्यामध्ये सुध्दा लक्ष द्यावे. जे लाभार्थी आहे त्यांना ताबडतोब हप्त्याची रक्कम द्यावी.

श्रीमती.संगिता वाघुले : 25 ते 26 कर्मचाऱ्यांचा आता पर्यंत पगार दिलेला नाही. ते काम करतात. त्याचा पण खुलासा करण्यात यावा.

मा.अति.आयुक्त : आठ लाभार्थ्यांना पहिला हाप्ता दिला होता. आणि दुसरा हाप्ता मार्च मध्ये मिळेल तेव्हा ते प्रलंबित जे कर्जदार राहिलेले आहेत त्या लोकांना तो निधी मिळेल. 25 कर्मचाऱ्यांच्या पगाराबाबतीत ती फाईल मंजुरीसाठी घन कचरा विभागाकडुन माझ्याकडे आली होती. ती मी शिफारस करुन मा.आयुक्तांकडे पाठवली. याबाबत घन कचऱ्याचे प्रमुख श्री.पाटील माहिती देतील.

श्रीमती मनिषा मुंढे : माझ्या वार्डात जयभवानी नगरमध्ये दोन वर्षापासुन नाला खोदुन ठेवला. संरक्षित भिंतीचे काम होत नाही. अतिक्रमण काढले जात नाही.

कार्यकारी अभि.(ड्रेनेज) : 800 मीटर नाल्यातील काम केले पुढचे काम करण्यासाठी अतिक्रमण काढावे लागते. ते अतिक्रमण विभागाचे काम आहे. त्यांना तसे कळविले आहे.

मा.सभापती : त्वरित कार्यवाही करावी.

श्री.सिध्दांत सिरसाट : कचरा प्रश्न सोडविण्यासाठी बजेट मध्ये दोन कोटीची तरतुद केली होती का?

लेखाधिकारी : तरतुद केली होती की नाही माहिती घेऊन सांगता येईल.

श्री.सिध्दांत सिरसाट : तरतुद केली जाते. परंतु काम करण्याची भावना नसते. तरतुद असून प्रोसेसिंग मशीन का खरेदी केल्या नाही. 25 दिवसात मोठा कचरा साचला. झोनला डम्पं केला जातो. सर्व कचऱ्याची विलेवाट त्वरीत लावावी. रात्रीच्या वेळी कचरा नेऊन टाकतो नागरिकांना विश्वासात घेत नाही हे योग्य नाही. नागरीक विरोध करतात विश्वासात घ्यावे. पोलीस लाठीचार करतात, नागरीकांना मारतात, वयोवृध्द लोकांना पोलीसांनी मारहाण केली. मनपाच्या चुकामुळे हा प्रकार झाला. नारेगावची परीस्थिती इतर ठिकाणी होऊ नये. गाड्या जाळल्या तोडफोड केली याची भरपाई कोण देणार आहे. योग्य तो ठोस निर्णय घ्यावा. नागरीकांना त्रास होईल अशी कार्यवाही होऊ नये.

मा.सभापती : मिटमिटा येथे जो प्रकार झाला. त्या ठिकाणी नागरीकांना विश्वासात घेऊन योग्य निर्णय घेणे अपेक्षित होते. योग्य विचार करुन सर्वांना विश्वासात घेऊन तेथील कचऱ्याचा प्रश्न सोडवावा.

| | |
|---|---|
| श्री.सिताराम सुरे | : माझे वार्डात 5 गल्ल्यांना दुषित पाणी येते. |
| मा.सभापती | : श्री.पद्मे यांना माझे कॅबीनमध्ये चर्चेसाठी बोलविण्यात येईल सुचना देता येईल. |
| श्री.सिताराम सुरे | : लाईट बदलले जात नाही. LED लाईट लावत नाही. भक्तीनगर भागात लाईट बंद आहे. |
| उपअभियंता(विद्युत) | : लाईटची दोन दिवसात व्यवस्था करुन दिली जाईल. |
| श्री.सिताराम सुरे | : नगर रचना विभागात किती संचिका प्रलंबीत आहे. |
| मा.सभापती | : अनेक संचिका मंजुरीसाठी आहे. परवानगी देत नाही. त्या विभागाचा चार्ज शहर अभियंता कडे द्यावा. श्री.थत्ते यांना त्यांचे मुळ विभागात पाठवावे. |
| श्रीमती.राखी देसरडा | : सहाय्यक संचालकनगर रचना या पदावर श्री.थत्ते हे शासनाचे अधिकारी आहे. ते काम व्यवस्थित पणे करत नाही. या विभागाचे वर्कआऊट व्यवस्थीत जर झाले तर मनपाची आर्थिक परिस्थिती सुधारेल. शासनाकडे श्री.थत्ते यांची दखल नोंदवावी आणि हा चार्ज जे सक्षम अधिकारी असेल त्यांच्याकडे देण्यात यावा. परवानगीच्या संचिका प्रलंबित आहे. लोकांना बॅक लोन घ्यावे लागते. परवानगी नसल्याने बॅक लोन देत नाही. नागरीकांना त्रास होतो आहे. दखल घ्यावी. |
| मा.सभापती | : श्री.ए.बी.थत्ते यांची वागणुक बरोबर नाही. यांची काम करण्याची पध्दत अत्यंत चुकीची आहे. असे वारंवार दिसुन आले असुन सुध्दा प्रशासनाने याची दखल घेतलेली नाही. प्रशासनाला पुन्हा आदेशित करण्यात येते की, याची दखल घ्यावी. त्यांना काम करायचे नसेल तर त्यांना त्यांच्या मुळ विभागात पाठवावे. |
| श्री.ऋषिकेश खैरे | : माझ्या वार्डात अशोक हॉटेलच्या बाजुला जागा आहे. तेथे कचरा डम्पं करण्यासाठी जागा स्वच्छ करुन घेतली आणि नागरीकांना सांगण्यात आले की येथे कचरा डम्पं होणार जेव्हा आम्ही पुढाकार घेतो तेव्हा प्रशासनाला इनट्रेस्ट नसतो आणि आता न सांगता कचरा टाकत आहे. |
| मा.सभापती | : ज्या-ज्या वार्डामध्ये काम करत आहोत त्या वार्डाचे नगरसेवकांना बोलवुन विश्वासात घेऊन काम करण्यात यावे. |
| श्रीमती.किर्ती शिंदे | : महानगरपालिका शाळा नागेश्वरवाडी, येथे इंग्रजी आणि सेमी इंग्रजी शाळा सुरु करण्यासंबंधी प्रस्ताव दिला होता आणि तो मंजुर सुध्दा झाला होता. त्यावर फक्त मा.आयुक्तांची परवानगी हवी होती. त्या फाईलवर सही झाली की नाही याचा खुलासा करण्यात यावा. |
| शिक्षणाधिकारी | : हा प्रस्ताव मंजुर आहे. इतर बाबतीत निर्णय घ्यावा लागेल. इंग्रजी माध्यमाची शाळा जुन मध्ये सुरु करता येईल. त्यासाठी महानगरपालिके तर्फे शिक्षक नेमावे लागतील. आणि त्यांच्या मानधनाची जबाबदारी महानगरपालिकेला घ्यावी लागेल. |
| मा.सभापती | : आदेशित करण्यात येते की, शाळा जुन महिन्यामध्ये सुरु होणार आहे. त्या पुर्वी त्वरित मार्च पर्यंत सर्व कामे पुर्ण करा. |
| श्रीमती.किर्ती शिंदे | : शासनाने आदेशित केले होते की, सर्व विद्यार्थ्यांना आधार कार्ड आवश्यक आहे त्या नंतरच गणवेश वाटप होईल. आता पर्यंत 60 ते 70 टक्के विद्यार्थ्यांचे आधार कार्ड बनवुन झाले आहे. 40 टक्के विद्यार्थ्यांचे बाकी आहे. प्रत्येक शाळेमध्ये आधार कार्ड बनवुन देण्याची सुविधा करुन द्यावी. |
| मा.सभापती | : हा सर्व शाळेचा प्रश्न आहे. सर्व शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्यासाठी योग्य प्रकारचे मशिनस् आणि यंत्रणा उपलब्ध करुन देण्यात यावे. |
| श्री.सिध्दांत शिरसाट | : माझ्या वार्डात भाडेत्तत्वावर इमारत घेऊन बालवाडी चालु केलेली आहे. त्याचे भाडे सहा महिने झाले मिळाले नाही. एक तर ती शाळा चालु ठेवावी किंवा बंद करण्यात यावी. त्या शाळेमध्ये कमीत कमी पन्नास विद्यार्थी शिक्षण घेत आहे. |
| शिक्षणाधिकारी | : पहिल्या वेळेचे पेमेंट झालेले आहे. दुसऱ्या वेळेचे बाकी आहे. दोन दोन महिन्याला पेमेंट करत असतो. |

| | |
|---|---|
| मा.सभापती | : त्यांचे पेमेंट देण्यात यावे आणि महिना ते महिना पेमेंट करण्यात यावे. |
| श्री.सय्यद मतीन | : बारुदगर नाल्यावरील चिकनच्या दुकानांनवर कारवाई करण्यात आली. त्यावर स्टे होता. सकाळी सात वाजता दुकानांचे जाळ्या तोडण्यात आले. अशा प्रकारची कारवाई का करण्यात आली? |
| कक्ष प्रमुख(अतिक्रमण) | : कोबड्यांच्या मांसामुळे होणार कचरा याचा अटकाव करण्यासाठी मा.आयुक्तांनी आणि सभागृहाने दिलेल्या आदेशानुसार शहरात जे काही अनाधिकृत किंवा उगड्यावर मांस विक्री, रस्त्यावर करत होते अशा लोकांना अटकाव करण्यासाठी मोहिम हाती घेतलेली आहे. यामध्ये आम्ही त्याचे रस्त्यावरचे पिंजरे उचललेले आणि परत केले. सात वाजता मोहीम सुरु केली होती. दुकानमध्ये घुसून सामान उचलले नाही. |
| श्री.सय्यद मतीन | : दुकानामध्ये जाऊन काऊंटर तोडले, फर्श्या तोडले आहे. याची चौकशी करण्यात यावी. |
| मा.सभापती | : यामध्ये जे मा.कोर्टामध्ये जे प्रकरण असते वाद असेल ते तपासुन योग्य प्रकारची कारवाई करण्यात यावी. कारवाई करण्यापुर्वी सर्व टीमला आदेशित करा की, परमिशन असलेल्या जागेवर कोणत्याही प्रकारची कारवाई करु नये. |
| श्री.सय्यद मतीन | : वार्ड क्र.44 रविंद्र नगरमध्ये ड्रेनेजचे प्रोब्लेम आहे. श्री.अफसर सिद्दिकी यांना परत परत सांगुन सुध्दा काहीच केले नाही. रहेमानिया कॉलनीमध्ये ब्रिज नादुरुस्त आहे. काम होत नाही. याचा पण खुलासा करण्यात यावा. |
| कार्यकारी अभियंता(ड्रे) | : नाल्यामध्ये लाईन टाकण्याचे आहे, तेथे अतिक्रमण झाले आहे. रहेमानिया कॉलनीच्याबाबतीत हे प्रकरण न्याय प्रविष्ट मॅटर होते. महानगरपालिकेने त्या जागा मालकाचे मोबदल्याची कारवाई आणि ड्रेनेज लाईनचे काम सामजस्य पणे करावे. हे साडे चारशे मी. काम होते. तीनशे मी. काम केलेले आहे. |
| मा.सभापती | : प्रशासनाला आदेशित करण्यात येते की, टाऊन प्लॅनिंग विभागामुळे हे काम थांबले आहे. श्री.अफसर सिद्दिकी यांच्या बरोबर चर्चा करुन संबंधीत जे व्यक्ती आहे त्यांना योग्य प्रकारे पत्र व्यवहार करावा. मा.कोर्टाच्या आदेशाच्या आधिनराहुन ते काम करावे. |
| श्री.सय्यद मतीन | :स्थायी समितीमध्ये आपण रुलिंग दिली होती की, उर्दु शिक्षकांना पारीतोषीक(पुरस्कार) देण्यात यावे. आता पर्यंत ते देण्यात आले नाही. |
| शिक्षणाधिकारी | :विद्यार्थींना जेव्हा पुरस्कार दिला जाईल त्या वेळेला देण्याचे ठरवले होते. शिक्षण सभापती यांनी सुचना दिली,एखाद्या कार्यक्रमात पुरस्कार देऊ. त्यामुळे उशीर झाला. |
| मा.सभापती | : पुढच्या एखाद्या वेळी शाळेच्या कार्यक्रमामध्ये त्या दोन्ही उर्दु शिक्षकांना पुरस्कार देण्यात यावा. |
| श्री.सोहेल शेख | : वार्डात 250 स्क्वेअर फिट ड्रेनेज लाईन टाकायची आहे. काम होत नाही. वार्ड इजिनिअर यांना याबाबत खुलासा करण्यासाठी आदेशित करावे. |
| मा.सभापती | : प्रशासनास सुचना करण्यात येते की, सदरील काम तातडीने करण्यासाठी संबंधीत विभागाला आदेशित करावे. आणि याला कार्यत्तर मंजुरी देण्यात येते. |
| श्रीमती.संगिता वाघुले | : अनधिकृत वस्तीमध्ये शौचालय होत नाही का? या लोकांना ड्रेनेज लाईनची गरज नसते का? मुलभूत सुविधामधुन काम करावे. फाईलवर सही करुन पुढे पाठवण्यात यावे. |
| मा.सभापती | : लेखा विभागाने योग्य प्रकारे दखल घ्यावी. ही फाईल त्वरित निकाली काढावी. |
| श्रीमती.शेख नरगीस | : कट कट गेट जवळील अतिक्रमण कधी हटवण्यात येणार आहे? |
| कक्ष प्रमुख(अतिक्रमण) | : उद्या सकाळ पर्यंत तेथील अतिक्रमण हटवण्यात येईल. |
| श्री.राजगौरव वानखेडे | : सर्व कचरा प्रश्नाच्या कामात आहे असे सांगतात. प्रशासनाने तात्काळ आठ दिवसामध्ये स्थायी समितीकडे बजेट सादर करायला पाहिजे. आदर्श रस्ता म्हणुन वार्डात काम सुरु केले होते. 80 टक्के काम झाले आहे. वार्डातील उरलेले रस्त्याचे काम मागिल तीन महिन्यापासुन बंद आहे. आता पर्यंत काम का झाले नाही? येत्या चार दिवसामध्ये काम सुरु करावे नसता त्या कॉन्ट्रॅक्टरला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. |

कनिष्ठ अभियंता : दोन वेळेस सुचना दिली आहे. आज पुन्हा पत्र दिले जाईल.

मा.सभापती : संबंधीत ठेकेदाराला बोलवुन घ्यावे. काम सुरु करावे. आठ दिवसात काम सुरु करावे. आणि बेजट सादर करण्याची सुचना वेळो वेळी दिलेली आहे. याची दखल घ्यावी. स्टेनोसाठी मागच्या बैठकीमध्ये बोललो होतो. आपल्याकडे दोन स्टेनो होते त्यातील एक निघुन गेला आहे. लवकरात लवकर दोन स्टेनोची नियुक्ती करण्यात यावी. आणि नगर सचिव विभागात कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे इतिवृत्त तयार करणे व इतर कामे करण्यासाठी विलंब होतो तसेच नगर सचिव विभागातील श्री.एस.एस.चोबे, वरीष्ठ लिपीक हे 31 मार्च 2018 रोजी सेवा निवृत्त होत असल्याने त्यांच्या जागेवर त्वरीत तातडीने स्थानिक संस्थाकर विभागातील श्री.बी.टी.फोले, वरीष्ठ लिपीक कर्मचारी यांना तसेच या नगर सचिव विभागासाठी दोन स्टेनोग्राफर देण्याची कार्यवाही तातडीने करावी. तसे आदेश उपआयुक्त (आस्थापना) श्री.निकम यांना देण्यात येते.

**विषय क्र. 313 : (कार्य.अभि.-4 ते 7 व 9)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.64 गुलमोहर कॉलनी येथील सेक्टर जे मधील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुची नुसार रक्कम रू.25,83,526/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2017-18 मधील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा मधून प्रस्तावित आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 19/01/2018 रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी वार्ड क्र.64 गुलमोहर कॉलनी येथील सेक्टर जे मधील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे, या कामाचे र.रू.25,83,526/-चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र.313 ते 319 मंजुर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.64 गुलमोहर कॉलनी येथील सेक्टर जे मधील रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.25,83,526/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 314 : (कार्य.अभि.-4 ते 7 व 9)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.64 एन/5 येथील राजीव गांधी स्टेडीयमला संरक्षित भिंत बांधणे व इतर कामे करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-16 च्या दरसुची नुसार रक्कम रू.38,59,620/- चे तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च मनपा अर्थसंकल्प सन 2017-18 मधील क्रिडा संकुल या लेखाशिर्षा मधून प्रस्तावित आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 19/01/2018 रोजी मान्यता दिलेली आहे.

तरी वार्ड क्र.64 एन/5 येथील राजीव गांधी स्टेडीयमला संरक्षित भिंत बांधणे व इतर कामे करणे, या कामाचे र.रू.38,59,620/-चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.64 एन/5 येथील राजीव गांधी स्टेडीयमला संरक्षित भिंत बांधणे व इतर कामे करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.38,59,620/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 315 : (कार्य.अभि.-4 ते 7 व 9)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.65 मोतीवालानगर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे, या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रू.39,90,000/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 19/01/2018 अन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे.

सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2017-2018 मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.62 दि.15/11/2017 अन्वये वळती अंतर्गत लेखाशिर्ष नविन काँक्रीट रस्ते, जी.बी.आर., वार्ड-07, पृष्ठ क्र.51 अ.क्र.05, रक्कम रू.40.00 लक्ष तरतूद उपलब्ध आहे. करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.39,90,000/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.65 मोतीवालानगर अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण करणे, या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.39,90,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 316 : (कार्य.अभि.-4 ते 7 व 9)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.80 अंतर्गत विविध रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2015-16 च्या दरसुचीनुसार र.रू.29,94,410/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन 2017-18 च्या अर्थसंकल्पातील शहरी भागात पुनर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्षक मधुन करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रक र.रू.29,94,410/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.80 अंतर्गत विविध रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.29,94,410/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 317 : (कार्य.अभि.-4 ते 7 व 9)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.81 ठाकरेनगर, मायानगर व एस.टी.कॉलनी येथे काँक्रीट रस्ता तयार करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2015-16 च्या दरसुचीनुसार र.रू.49,79,693/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन 2017-18 च्या अर्थसंकल्पातील नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षक मधुन करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रक र.रू.49,79,693/- चा अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.81 ठाकरेनगर, मायानगर व एस.टी.कॉलनी येथे काँक्रीट रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.49,79,693/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 318 : (संचालक,प्राणी संग्रहालय)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या बायजीपुरा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी पशुवैद्यक हे पद मानधनावर भरण्याबाबत उमेदवारांची निवड करण्यासाठी समिती गठित करण्यात आली होती.

सदर पदासाठी दि.12/04/2016 रोजी थेट मुलाखतीद्वारे आलेल्या उमेदवारांमधुन त्यांच्या प्राप्त शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव व मौखिक मुलाखतीमध्ये प्राप्त गुणानुसार प्रतिक्षा उमेदवार डॉ.बाबासाहेब सुर्यभान मोरे यांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-1/2016/1314 दि.08/08/2016 नुसार पशुवैद्यक म्हणुन रू.25,000/- प्रतिमाह मानधनावर 06 महिन्यांकरीता अटी व शर्ती नुसार तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे.

तथापी डॉ.बाबासाहेब मोरे, पशुवैद्यक यांना 06 महिन्यांकरीता देण्यात आलेले नियुक्तीचा कालावधी दि.07/02/2017 रोजी संपलेला असल्याने व मुख्य पशुसंवर्धन अधिकारी यांनी त्यांच्या सेवेच्या

आवश्यकतेबाबत केलेल्या शिफारशीनुसार डॉ.मोरे यांना दि.20/04/2017 रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.985 नुसार एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-1/2017/993 दि.09/02/2017 पासून 06 महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे. सदरची मुतदवाढ दि.08/08/2017 रोजी संपलेली असून व सद्यस्थितीत त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याबाबत मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी शिफारस केली आहे.

करीता डॉ.बाबासाहेब सुर्यभान मोरे यांना पशुवैद्यक या पदावर दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन अटी व शर्तीनुसार दि.11/08/2017 पासून पुढील 6 महिन्यांकरीता मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या बायजीपुरा येथील पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी पशुवैद्यक हे पद मानधनावर भरण्यात आलेले होते, सदर पदावर डॉ.बाबासाहेब सुर्यभान मोरे यांना कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-1/2016/1314 दि.08/08/2016 नुसार पशुवैद्यक म्हणुन रू.25,000/- प्रतिमाह मानधनावर 06 महिन्यांकरीता अटी व शर्ती नुसार तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. तथापी डॉ.बाबासाहेब मोरे, पशुवैद्यक यांना 06 महिन्यांकरीता देण्यात आलेले नियुक्तीचा कालावधी दि.07/02/2017 रोजी संपलेला असल्याने व मुख्य पशुसंवर्धन अधिकारी यांनी त्यांच्या सेवेच्या आवश्यकतेबाबत केलेल्या शिफारशीनुसार डॉ.मोरे यांना दि.20/04/2017 रोजी झालेल्या मा.सर्वसाधारण सभेतील ठराव क्र.985 नुसार एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-1/2017/993 दि.09/02/2017 पासून 06 महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे. सदरची मुतदवाढ दि.08/08/2017 रोजी संपलेली असून व सद्यस्थितीत त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याबाबत मुख्य पशुसंवर्धन अधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी शिफारस केलेली असल्याने, डॉ.बाबासाहेब सुर्यभान मोरे यांना पशुवैद्यक या पदावर दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन अटी व शर्तीनुसार दि.11/08/2017 पासून पुढील 6 महिन्यांकरीता मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 319 : (कार्य.अभि.पा.पु.)**

विषय :झोन क्र.02 अंतर्गत विविध वार्डामध्ये पाणी पुरवठा देखभाल व दुरूस्तीची कामे करणे बाबत.

संदर्भ : Tender ID - 2017 AMCA-149713-55

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| 2. | कामाचे स्वरुप | जलवाहीनी टाकणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | --- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | रूपये 24,89,697/- |
| 4. | ज्या वृत्तपत्र/वेबसाईटवर टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | www.mahatenders.gov.in |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 04/09/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 06/09/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 01 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | शेख आसिफ शेख आरिफ | 24,89,697/- | 33.33% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7 | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |

| | | |
|---|---|---|
| 8 | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | 2016-17 AOSG च्या रकमेतून |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9 | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10 | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | नाही. |

